महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४४ वे | दिनांक : ३१/०८/२०२६ | वार : सोमवार

## मनोज जरांगेंची तळमळ कळतेय': मराठा समाजाला न्याय देण्याची सरकारची भूमिका - एकनाथ शिंदे



**परभणी :** परभणीतील शेतकरी मेळाव्यावरून मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील प्रचंड आक्रमक झाले आहेत. खासदार संजय जाधव यांना थेट इशारा देत त्यांनी हा मेळावा तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. परभणीच्या मेळाव्यात काही गडबड झाली तर मी जबाबदार राहणार नाही. मी तिथे आलो तर एकनाथ शिंदे यांना माघारी फिरणे अवघड होईल, असा दम जरांगे यांनी दिला आहे. असे असून देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे परभणीत शेतकरी मेळाव्यासाठी दाखल झाले. यावेळी बोलताना शिंदे यांनी अनेक विषयांवर भाष्य केलेच त्याचसोबत त्यांनी मनोज जरांगे यांचे कौतुक देखील केले आहे. मनोज जरांगे हे मराठा समाजासाठी लढत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी तळमळ आम्हाला कळत असल्याचेही शिंदे म्हणाले.

भाषणाच्या सुरुवातीला बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, ही जमवलेली गर्दी नाही. ही भाड्याने आणलेली माणसं नाहीत. हे सगळे माझे लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके युवा आणि लाडक्या बहिणी आणि लाडके शेतकरी आहेत. सकाळी 11 वाजल्यापासून आपण या ठिकाणी बसून आहात. तुमच्यासमोर दंडवत घातला पाहिजे. खऱ्या अर्थाने शिवसेना ही बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना पुढे नेण्याचे काम आपण करत आहोत. परवा रक्षाबंधन झाले, हजारो लाडक्या बहिणी आल्या होत्या, आजही अनेक लाडक्या बहीणींनी राख्या बांधल्या. माझे सगळ्यात मोठे पद म्हणजे मी लाडक्या बहीणींचा लाडका भाऊ.

एकनाथ शिंदे म्हणाले, आज या ठिकाणी मराठा समाज देखील मोठ्या प्रमाणावर आला आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो हा बळीराजा पाला पोशिंदा आहे. अन्नदाता आहे. त्यामुळे कुठलेही राजकारण या शेतकऱ्यांच्या आड येऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे, मनोज जरांगे यांची देखील तीच अपेक्षा आहे. मनोज जरांगे यांची तळमळ माहीत आहे. एक सर्वसामान्य कार्यकर्ता या समाजासाठी लढत आहे. मी मुख्यमंत्री असताना त्यांना दोन वेळा भेट दिली. आता देखील आमचे मंत्री त्यांच्या भेटीसाठी गेले आहेत. मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे, मराठा समाजासाठीचा लढा हा अनेक वर्षांपासून सुरू आहे. अण्णा साहेब पाटील यांचे आंदोलन तुम्हाला माहीत असेल. मात्र मराठा समाजाला न्याय देण्याचे काम सुरुवात कधी झाली असेल तर महायुतीचे सरकार 2014 साली आले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणाचेही आरक्षण कमी न करता 12-13 टक्के आरक्षण देण्याचे काम केले होते.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांनी जेव्हा उपोषण केले तेव्हा देखील त्यांची तळमळ आम्ही समजून घेतली. त्यांचे प्रयत्न मी पाहिले. जस्टिस शिंदे समिती आपण गठित केली, 10 टक्के आरक्षण लागू केले. कुणबी प्रमाणपत्र वाटप सुरू केले. सारथीला पैसे वाढवून दिले आहेत. कुठल्याही परिस्थितीत मराठा समाजाला न्याय देण्याचे काम हे सरकार करत आहे. 2014 नंतर खरी सुरुवात झाली आहे. समाजाला न्याय देण्याची भूमिका आमची आहे. कोणाचेही काढून कोणाला देणार नाही. समाजाची देखील तीच भूमिका आहे. आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या आंदोलकांच्या कुटुंबाला आपण आर्थिक मदत दिली, एसटीमध्ये नोकरी दिली आहे.पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री असताना मी अनेक योजना सुरू केल्या, आपल्या नावासमोर आईचे नाव लिहिण्याचा निर्णय आपण घेतला. शेतकरी आपला अन्नदाता, मायबाप आहे.

## 'स्वतःला देव समजता का?' FDA ला हायकोर्टाचा दणका

**मुंबई :** "तुम्ही स्वतःला देव समजता का? तुम्ही वाटेल ते करू शकता का? डास मारण्यासाठी तलवारीचा वापर कशाला करता? न्यायालयात दाखल होणाऱ्या १ हजार अवमानना याचिकांपैकी ५०० याचिका केवळ सरकारचा आदेश न पाळण्याच्या वृत्तीमुळे असतात. आम्ही तुमच्या अधिकाऱ्यांना समजावून आणि ओरडून थकलो आहोत. आदेश डावलल्यास थेट तुरुंगात पाठवू,' अशा अत्यंत संतप्त शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने अन्न व औषध प्रशासनाची कानउघाडणी केली. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) पाच उपाहारगृहांचे परवाने घाईघाईने निलंबित केल्याप्रकरणी न्यायालयाने प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. न्यायालयाचा सज्जड दम आणि अवमानना कारवाईच्या इशाऱ्यानंतर एफडीएने निलंबनाचा निर्णय तातडीने मागे घेतला असून सर्व उपाहारगृहे पूर्ववत सुरू करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. कायद्याचा सखोल अभ्यास न करता आणि वस्तुस्थितीची शहानिशा न करता केवळ अति-तांत्रिक कारणांवरून थेट व्यवसाय बंद पाडण्याच्या एफडीएच्या मनमानी कार्यपद्धतीवर खंडपीठाने तीव्र ताशेरे ओढले. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) सिप्ला फार्माच्या पुणे येथील युनिटचा औषध विक्री परवाना रद्द करण्याचा आदेश शनिवारी मागे घेतला. सुनावणीची कोणतीही संधी न देता सुटीच्या दिवशी थेट कारवाई केल्याने मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएच्या कारभारावर कडक ताशेरे ओढले. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने या कारवाईला नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाविरुद्ध म्हटले.

## समृद्धी महामार्गावरील लूटप्रकरणी दरोडेखोराला अटक






**छत्रपती संभाजीनगर :** मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर दरोडेखोरांच्या लूटमार प्रकरणात पोलिसांना पहिले यश मिळाले आहे. लासूर (ता. वैजापूर) टोलनाक्याजवळ भरदुपारी फॉर्च्युनर गाडी लुटणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीतील एका दरोडेखोराला तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी जेरबंद केले. उर्वरित दरोड्याच्या गुन्ह्यातील दरोडेखोरांचा पोलिस शोध घेत आहेत. गुरुवारी मध्यरात्री सिन्नर (जि. नाशिक) जवळच्या दुशिंगवाडी शिवारात दरोडेखोरांनी छत्रपती संभाजीनगरच्या एका कुटुंबासह हिंगोलीतील रुग्णाच्या गाडीला लक्ष्य केले होते.

तर २६ ऑगस्ट रोजी दुपारी ४.१० ते ४.२० दरम्यान साहिल सतीश सोनवणे (२२, रा. टाकळीमिया, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) यांच्या फॉर्च्युनरला लासूर टोलनाक्याजवळ रोखून आठ अनोळखी व्यक्तींनी मारहाण करून गळ्यातील दीड लाख रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावली होती. अन्य एका घटनेत राखीपौर्णिमेसाठी मुंबईला जाणाऱ्या ॲड. श्रीकांत मिश्रा यांच्या गाडीखाली रात्री ११.१५ वाजता रॉड फेकून टायर फोडण्यात आले. गाडी थांबताच १२ जणांच्या टोळक्याने मारहाण सुरू केली.

दरोडेखोरांनी त्यांच्या पत्नीच्या कुशीतील १९ महिन्यांच्या 'अवधूत'ला हिसकावले. 'सोनं, पैसे घ्या पण लेकराला सोडू नका' या आईच्या विनवणीनंतरही क्रूर दरोडेखोरांनी बाळाला सिमेंटच्या रस्त्यावर फेकले व अंगावरील दागिने ओरबाडले. तब्बल २५ मिनिटे हा थरार सुरू होता. यावेळी हजारो गाड्या गेल्या, मदतीला कुणीही थांबले नाही.

या घटनेनंतर तासाभरातच १२.४० च्या सुमारास हिंगोलीहून जखमी रुग्णाला केईएम रुग्णालयात (मुंबई) नेणाऱ्या एर्टिगा कारचे इंजिन रस्त्यावर वस्तू फेकून फोडण्यात आले. प्रवासी खाली उतरताच १० ते १५ जणांच्या टोळीने मारहाण करत १ लाखाचा ऐवज लुटला. हे दरोडेखोर शुद्ध मराठीत बोलत होते.

लूटमारीनंतर शनिवारी वावी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. मात्र, एफआयआरसाठी रुग्णासह नातेवाइकांना पाच तास ताटकळत ठेवण्यात आले. मीडिया आल्यावरच जबाब नोंदवला. दरम्यान, पोलिस अधीक्षक डॉ. डी. स्वामी यांनी गाडीतून न उतरताच केवळ ५-७ मिनिटे अधिकाऱ्यांशी चर्चा करून घटनास्थळाची पाहणी उरकली.

२६ ऑगस्टला लासूरजवळ साहिल सोनवणे यांची फॉर्च्युनर अडवून आठ जणांनी मारहाण करत दीड लाखांची सोनसाखळी लुटली होती. यातील एकाला तांत्रिक विश्लेषण व फॉर्च्युनरच्या बॅक कॅमेऱ्यातील फुटेजच्या आधारे शनिवारी अटक करण्यात आली. त्याला ५ दिवसांची पोलिस कोठडी मिळाली असून, इतर ७ आरोपींसाठी पाच पथके रवाना झाली आहेत.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ ऑगस्ट २०२६


## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त इकरा पब्लिक स्कूलमध्ये पारंपरिक खेळांचे आयोजन





**जळगाव (प्रतिनिधी) :** हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणारा राष्ट्रीय क्रीडा दिन इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, जळगाव येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध पारंपरिक व देशी खेळांचे आयोजन करून त्यांना भारतीय क्रीडा संस्कृती आणि आपल्या मुळांशी जोडण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शाळेचे मैदान खेळांच्या उत्साहाने फुलून गेले होते. विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, खो-खो, लंगडी, गिल्ली-दांडा, लगोरी,गोट्या, भोवरा, दोरीवरच्या उड्या,पतंगबाजी तसेच आबा-धाबी अशा विविध पारंपरिक खेळांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत खेळांच्या माध्यमातून हॉकीचे महान जादूगार मेजर ध्यानचंद यांना अनोखी आदरांजली वाहिली.आजच्या मोबाईल आणि डिजिटल युगात मुले हळूहळू मैदानी खेळांपासून आणि पारंपरिक खेळांपासून दूर जात आहेत.अशा परिस्थितीत शाळेने आयोजित केलेल्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांना मोबाईलच्या आभासी जगातून बाहेर काढून मैदानातील खेळांचा खरा आनंद अनुभवण्याची संधी दिली. कोणी गोट्या खेळण्यात दंग होते, तर कोणी भोवरा फिरविण्यात आपले कौशल्य दाखवत होते.पतंगबाजी, गिल्ली-दांडा आणि इतर पारंपरिक खेळांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. मुलांनी मनमोकळेपणाने खेळांचा आनंद घेत आपल्या बालपणातील निरागस क्षण पुन्हा अनुभवले.यावेळी शाळेचे चेअरमन डॉ.अ.करीम सालार यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, “शाळेला प्रेशर कुकर बनवू नका; मुलांना त्यांचे बालपण जगू द्या.” शिक्षणासोबतच खेळांना तितकेच महत्त्व देणे आवश्यक असून खेळामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो. खेळ मुलांना शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त, मानसिकदृष्ट्या आनंदी, शिस्तप्रिय आणि आत्मविश्वासपूर्ण बनवतात. चांगले आरोग्य ही जीवनातील सर्वात मोठी संपत्ती आहे, असेही त्यांनी नमूद केले.पारंपरिक खेळांचे पुनरुज्जीवन करून नवीन पिढीला आपल्या संस्कृतीशी आणि मुळांशी जोडण्याचा इकरा पब्लिक स्कूलचा हा उपक्रम अत्यंत प्रशंसनीय असल्याचे डॉ. सालार यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## कवी-लक्ष्मण गं.वाल्डे यांच्या टेलर या कवितासंग्रहाचे प्रकाशन संपन्न




**कन्नड :** आयोजित तिफण लेखक -वाचक मेळावा, जामखेड ता. अंबड जि. जालना येथिल जांबुवंत गडावर टेलर या कवितासंग्रहाचे भव्य प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक- जेष्ठ साहित्यिक प्रा.बसवराज कोरे अध्यक्ष - जेष्ठ ग्रामीण साहित्यिक उत्तम बावस्कर, कार्यक्रमाचे आयोजक तिफणकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे, प्रा. डॉ. विजय भोसले, डॉ. अंबादास सगट , डॉ. रामचंद्र झाडे, अॅड. कृष्णा काका जाधव , अशोक दुधकर, संजय गायकवाड, संदीप ढाकणे, भरत सोनवणे, श्रीराम दाबके, पेरणीकार ज्ञानेश्वर गायके, सुनील डोके, प्रमोद पठारे, हबीब भंडारे, किरण निकम, अशोक गायकवाड, सुनील उबाळे, डॉ. भानुसे, प्रा. प्रिया धारुरकर, सुनिता कपाळे, डोके मॅडम, समस्त तिफण साहित्य परिवार -कन्नड- छ. संभाजीनगर -जालना-सिल्लोड जांबुवंत गड, लेखक-वाचक मेळावा कार्यक्रमाचे आयोजक कल्याण काका खडके व समस्त टीम, समस्त जामखेड नागरिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक समस्त बंधू भगिनी या सर्वांनी प्रकाशनला उपस्थित राहून पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या... विजय कुमार पांचाळ सर यांनी बहरदार संचलन करुन कार्यक्रम फुलवला , कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संदीप ढाकणे यांनी करुन कार्यक्रमाचा गोड शेवट केला...

## आदिवासी समाजाच्या एकजुटीचा नवा अध्याय; ठाकरवाडीत आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशनच्या उपशाखेचे जल्लोषात उद्घाटन



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** येथे आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या शाखेची उपशाखेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला.या कार्यक्रमास आदिवासी ठाकर समाजातील संस्थेचे संस्थापक श्री पांडूरंग पारधी, फाउंडेशन चे कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, रामचंद्र मधे,महिला जनाबाई मधे,सविता मेंगाळ गिताबाई पारधे,ऊषाबाई पारधे, व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन जळगाव चे तालुका अध्यक्ष मधुकर मेंगाळ तालुका उपाध्यक्ष सुनिल गावंडे, सचिव रविंद्र फोडसे, सदस्य रामा गावंडे गिरजू मधे निरगुडी बु ठाकरवाडी शाखेचे अध्यक्ष सनिराम गावंडे , उपाध्यक्ष रंगनाथ मेंगाळ सचिव बाळू मधे महिला अध्यक्ष वंदना मेंगाळ यांनी आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार करण्यात आला.कार्यक्रमात आदिवासी समाजाचे हक्क, शिक्षण, सामाजिक एकता, युवकांचे संघटन आणि समाजातील विविध प्रश्नांवर फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष श्री पांडुरंग पारधी, जळगाव शाखेचे श्री मधुकर गावंडे , सुधाकर मेंगाळ, श्री अंकुश मेंगाळ मुख्याध्यापक यांनी मार्गदर्शन करण्यात आले. फाउंडेशनच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.उपशाखेच्या स्थापनेमुळे ठाकरवाडी व परिसरातील आदिवासी समाजामध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, “जय आदिवासी, जय जोहार”*च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. श्री पांडुरंग मधे , गंगाराम मेंगाळ रंगनाथ मेंगाळ शिवराम मेंगाळ रामभाऊ पारधे, रामभाऊ गावंडे,रामा मेंगाळ, कडूबा गांगड, लक्ष्मण पारधे, सोमिनाथ मेंगाळ , नागू कातवारे बाळाबाई बांगारे, सिताबाई आगिवले, सिंधुबाई मेंगाळ ,सोमाबाई कातवारे हजाराने आदिवासी समाज उपस्थित होता मान्यवरांचे व समाजबांधवांचे आभार श्री आवाले सर यांनी मानून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ ऑगस्ट २०२६

# मायेचा आधार : गुरुवर्य डॉ. मथुताई सावंत

जन्म देणारी आई ही भाग्याने मिळते; पण जन्मानंतरच्या आयुष्याला मायेची ऊब, ज्ञानाची शिदोरी, संस्कारांची श्रीमंती आणि जगण्याची नवी दृष्टी देणारा गुरू भेटणे, हे त्याहून मोठे भाग्य असते. माझ्या आयुष्यात अशाच प्रेमळ आणि मार्गदर्शक गुरू भेटल्या, त्या म्हणजे आदरणीय डॉ. मथुताई सावंत. माझ्या आयुष्यात मथुताईंचे स्थान असेच मातृत्वाची अनुभूती देणारे आहे. पीपल्स कॉलेजमधील विद्यार्थिजीवनात मला पुस्तकी ज्ञान तर मिळालेच, शिवाय मायेचा आधार मिळाला, जगण्याची उमेद मिळाली, संकटांना सामोरे जाण्याचे बळ मिळाले आणि जीवनाचं सार्थक कसं करावं, याची शिकवण मिळाली. म्हणूनच त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला मराठी विषयात एम.फिल आणि पीएच.डी ह्या पदव्या सन्मानाने प्राप्त करता आल्या. डॉ. मथुताई म्हणजे मायेची ऊब, ज्ञानाचा दीप आणि प्रेरणेचा अखंड झरा आहेत याची प्रचिती येत गेली. ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रात तब्बल ४२ वर्षे अध्ययन-अध्यापनाचे कार्य करणाऱ्या मथुताई एका अर्थाने ज्ञानतपस्विनीच आहेत. अध्यापन हा त्यांच्यासाठी केवळ व्यवसाय नव्हे ; तर ते एक सामाजिक व नैतिक दायित्व आहे. खेड्यापाड्यांतून आलेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला त्यांनी दिशा दिली. त्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला, त्यांना वाचनाची गोडी लावली, प्रश्न विचारण्याची सवय लावली आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला शिकवले. त्यांच्यासाठी विद्यार्थी म्हणजे केवळ वर्गातील उपस्थिती क्रमांक नव्हता, तर तो घडवायचा एक जीव, उजळवायचे एक भविष्य आणि समाजासाठी तयार करायचा एक संवेदनशील नागरिक होता. म्हणूनच अनेक विद्यार्थ्यांच्या मनात मथुताई ह्या प्रेमळ आई, ज्ञानवंत गुरू आणि उज्ज्वल प्रेरणास्रोत या तिन्ही रूपांत आहेत.मथुताईंच्या जीवनात शिक्षण, साहित्य आणि राजकारण यांचा सुंदर असा त्रिवेणी संगम दिसून येतो. त्यासोबतच समाजकारण हा त्यांच्या आस्थेचा आणि बांधिलकीचा विषय आहे. त्यांच्या साहित्याने समाजातील वेदना, संघर्ष आणि वास्तवाला शब्द दिले; तर सामाजिक व सार्वजनिक जीवनाने त्या वास्तवाशी प्रत्यक्ष जोडून घेण्याची संधी दिली. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात केवळ पाठ्यघटक शिकविणारा प्राध्यापक किंवा शब्दाशी खेळणारी लेखिका दिसत नाही, तर समाजाच्या सुख-दुःखाशी एकरूप झालेली संवेदनशील कार्यकर्ती दिसते.डॉ. मथुताई सावंत यांनी १९८७ ते २००५ ही १८ वर्षे राजर्षी शाहू विद्यालय नांदेड येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर मराठी विषयाचे अध्यापन केले. २००५पासून आजपर्यंत पीपल्स कॉलेज नांदेड येथे पदवी व पदव्युत्तर वर्गांना मराठी विषयाचे अध्यापन आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३० विद्यार्थ्यांनी एम.फिल पदवी आणि ५ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. ही पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे अनेक विद्यार्थी त्यांचा आदर्श नजरेसमोर ठेवून शिक्षण क्षेत्रात अध्यापन व संशोधनाचे कार्य करत आहेत. पीपल्स कॉलेजमधील साहित्याची परंपरा नरहर कुरुंदकरांपासून डॉ. मथुताई सावंत यांच्यापर्यंत अखंड चालू आहे. डॉ. मथुताई सावंत यांनी 'पाण्यातील पायवाट', 'तिची वाटच वेगळी', 'पाणबळी', 'निवडुंगाची फुलं' (कथासंग्रह), 'राहू-केतू', आणि 'जीनगानी' (कादंबरी), 'समाजशिक्षिका सावित्रीबाई फुले', 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे', 'राजर्षी शाहू महाराज' (चरित्र), 'नवरसांची नवलाई', 'लगीनघाई? मुळीच नाही' (नाटक), 'कथाकार भास्कर चंदनशिव', 'सृजनाचा शोध', 'समाज, साहित्य आणि संस्कृती', 'साहित्य सौरभ', 'अक्षरवाटा', 'अधोरेखित' (समीक्षाग्रंथ) 'एकनाथ आव्हाड यांचे बालसाहित्य' आणि 'भगवान अंजनीकर यांचे बालसाहित्य' (संपादन) , सूर्यमुद्रा (गौरवग्रंथ संपादन) इ. विपुल साहित्य लेखन व संपादन केले आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाला बहुआयामी स्वरूप प्राप्त झाले आहे. मथुताईंच्या साहित्याचा विचार केला, तर त्यांच्या लेखणीची ग्रामीण जीवनाशी असलेली घट्ट नाळ दिसून येते. ग्रामीण समाजातील शोषितांचे जगणे, त्यांचा जीवनसंघर्ष, रूढी-प्रथा-परंपरा, सामाजिक विषमता, स्त्रीची दुःखं, तिची स्वप्नं, तिची धडपड आणि तिची अस्तित्वासाठीची लढाई या साऱ्या वास्तवाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दिसते. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने ग्रामीण स्त्री हा आहे. ग्रामीण स्त्रीच्या जगण्याकडे त्यांनी केवळ सहानुभूतीने पाहिले नाही, तर तिच्या अनुभवांना उद्गार दिला. तिच्या मनातील अस्वस्थता, तिचे मौन, तिचा संघर्ष आणि तिची जिद्द यांना त्यांनी शब्द दिला. डॉ. मथुताई सावंत यांच्या 'राहू-केतू' आणि 'जिनगानी' या कादंबरी लेखनामुळे 'मराठवाड्यातील पहिली ग्रामीण कादंबरी लेखिका' अशी त्यांची मराठी साहित्याच्या इतिहासात नोंद झाली आहे. मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रीच्या जीवनाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणणाऱ्या महत्त्वाच्या स्त्री लेखिकांमध्ये मथुताईंचे नाव अग्रक्रमाने आणि आदराने घेतले जाते. मथुताईंच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यांच्या 'तिची वाट वेगळी' या कथासंग्रहातून अतिशय प्रभावीपणे होते. या कथांमधील स्त्री ही केवळ परिस्थितीची बळी नाही, तर ती परिस्थितीशी दोन हात करणारी, स्वतःची वाट स्वतः शोधणारी आणि आपल्या अस्तित्वाचा अर्थ नव्याने सांगणारी स्त्री आहे. ग्रामीण स्त्रीच्या जीवनातील अनेक व्यथा - वेदना कथा त्यांच्या लेखणीतून मुखर झाल्या आहेत. ज्या स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आवाज मिळत नाही, त्यांच्या भावना, प्रश्न आणि संघर्षांना मथुताईंच्या साहित्याने उजागर केले आहे. त्यामुळे त्यांच्या कथा ह्या केवळ गोष्टी राहत नाहीत, तर त्या ग्रामीण स्त्रीजीवनाचा सामाजिक दस्तऐवज बनतात.मथुताईंच्या लेखनात ग्रामीण साहित्याबरोबरच स्त्रीवादी जाणीवही प्रकर्षाने जाणवते. स्त्रीला केवळ कुटुंबातील जबाबदारी किंवा सामाजिक चौकटीत न पाहता स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून पाहण्याची दृष्टी त्यांच्या लेखनात आहे.ग्रामीण स्त्रीच्या प्रश्नांना त्यांनी तिच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भांसह समजून घेतले. त्यामुळे त्यांच्या लेखनातील स्त्रीवाद हा केवळ घोषणात्मक नाही, तर तो इथल्या मातीतून उगवलेला, अनुभवातून आलेला आणि वास्तवाच्या पायावर उभा असलेला स्त्रीवाद आहे. मथुताईंच्या साहित्यकृतींच्या शीर्षकांकडे पाहिले, तरी त्यांच्या साहित्यिक जाणिवेची वेगळी ओळख होते. त्यांच्या शीर्षकांतूनच विषयाचा पैस, जीवनातील वास्तव आणि आशयाची दिशा सूचित होते. कोणतेही शीर्षक हे केवळ त्या साहित्यकृतीचे नाव नसते, तर ते त्या लेखनाच्या आत्म्याचे संकेत देणारे प्रतीक असते. मथुताईंच्या लेखनात ही जाणीव विशेषत्वाने दिसून येते.महाराष्ट्रातील महत्त्वाचे साहित्यिक दांपत्य म्हणून ज्यांचा उल्लेख आदराने केला जातो अशा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक डॉ. सुरेश सावंत आणि गुरुवर्य डॉ. मथुताई सावंत यांनी साहित्य लेखन विपुल प्रमाणात केलेले आहे. हे साहित्यिक दांपत्य म्हणजे नांदेडचे भूषण आहे. यांचे सहजीवन म्हणजे बहुजन समाजातील एक आदर्श आहे. अनेक समकालीन साहित्यिकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध राहिले आहेत.साहित्य संमेलने, साहित्यसंवाद, विचारांची देवाणघेवाण आणि नव्या लेखनाला प्रोत्साहन या माध्यमातून त्यांनी साहित्यिक वातावरण समृद्ध केले आहे. त्यांच्या सहवासात राहणे म्हणजे साहित्याच्या विविध प्रवाहांशी परिचित होणे आणि विचारांच्या नव्या वाटा शोधणे, असा अनुभव अनेकांना आला आहे. त्यांच्या 'राहू-केतू', 'तिची वाटच वेगळी' आणि 'निवडुंगाची फुले' या तीन साहित्यकृतींना महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या पुरस्कारांसह त्यांच्या अनेक साहित्यकृतींना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. मथुताईंना साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रात अनेक मान-सन्मान प्राप्त झाले. विविध साहित्य संमेलनांचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. हे त्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाचे आणि सामाजिक योगदानाचे द्योतक आहेच, तथापि मथुताईंच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे मोठेपण त्या पुरस्कारांत किंवा त्यांनी भूषविलेल्या पदांमध्ये नाही. ते आहे त्यांच्या माणसं जोडण्याच्या वृत्तीत, विद्यार्थ्यांना घडवण्याच्या तळमळीत आणि समाजाच्या प्रश्नांशी असलेल्या बांधिलकीत.माझ्यासाठी मथुताई ह्या केवळ एक लेखिका नाहीत आणि केवळ प्राध्यापक नाहीत. त्या माझ्या आयुष्यातील मायेची सावली आहेत. कधी त्या आईच्या प्रेमाने पाठराखण करतात, कधी कडक गुरूसारख्या वस्तुनिष्ठ मार्गदर्शन करतात, तर कधी शांत संवादातून जीवन समजावून सांगतात. त्यांच्या शब्दांत आधार आहे आणि विश्वास आहे. त्यांच्या विचारांत दिशादिग्दर्शन आहे आणि त्यांच्या कृतीत माणुसकी आहे.मथुताईंनी दिलेली मायेची ऊब, ज्ञानाची शिदोरी आणि जगण्याची दृष्टी ही माझ्या आयुष्यातील अनमोल ठेव आहे. म्हणूनच त्यांचा सहवास आणि त्यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी सदैव प्रेरणादायी राहिले आहे. मथुताईंच्या जीवनाचा विचार केला, तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती ही की, त्यांनी आत्मकेंद्री आणि एकांगी आयुष्य कधीच जगले नाही, तर अनेकांचे आयुष्य घडवले. ४२ वर्षांच्या ज्ञानदानातून त्यांनी विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडवल्या. साहित्याच्या माध्यमातून ग्रामीण समाजाचे वास्तव शब्दबद्ध केले. ग्रामीण स्त्रीच्या जगण्याला आवाज दिला. चरित्रलेखन आणि समीक्षणातून साहित्यविश्व समृद्ध केले. सामाजिक व सार्वजनिक जीवनातून समाजाशी आपली नाळ जोडून ठेवली. म्हणूनच मथुताईंची ओळख एक व्यक्ती इतकी मर्यादित राहत नाही, तर त्या ज्ञान व साहित्य यांचा व्यासंग, ग्रामीण जीवनाची संवेदनशील भाष्यकार, स्त्रीच्या अस्मितेची समर्थ लेखिका आणि अनेकांच्या जीवनाला मायेचा आधार देणारी आई आहेत. माझ्या आयुष्यात हे भाग्य मथुताईंच्या रूपाने आले. म्हणूनच, मथुताई म्हणजे माझ्या आयुष्याला ज्ञानाची वाट दाखवणारी आणि जीवनाचं सोनं करणारी मातृछाया आहेत. अशा मातृतुल्य गुरुवर्य डॉ. मथुताईंच्या सेवानिवृत्तीनिमित्त हार्दिक शुभेच्छा! त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो, ही निर्मिकाकडे प्रार्थना.

**डॉ नारायण शिवशेट्टे,**
**अर्जापूर. जि. नांदेड**
**मो. ९४२२५५८५७३**

# मुके शब्द आता

मुके मुके शब्द आता,
किती बोलके रे झाले.
शब्दातून माणसांचे,
बोलणं कळून आले. १

शब्दातून समाजाचे,
वास्तव दिसू लागले.
मुक्या मुक्या शब्दातून,
स्वप्न मनात जागले. २

मुके मुके शब्द आता,
मांडू लागतात दुःख.
माणसांच्या जीवनात,
घेऊन येतात सुख. ३

मुके मुके शब्द आता,
घडवू लागले क्रांती.
शब्द शब्द वाचतांना,
मनास पडते भ्रांती. ४

शब्द हेच शस्त्र आहे,
वापरावे की जपून.
नाहीतर विरोधक,
बसले आहे टपून. ५

अरे शब्दाची महिमा,
आहे खूप खूप भारी.
मुके शब्द बोलताच,
जातात पळून सारी. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ ऑगस्ट २०२६

# शालेय विद्यार्थ्यांनी घेतला कार्यशाळेचा आनंद



**छत्रपती संभाजीनगर :** बालरंगभूमी परिषद ही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था आहे. या परिषदेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेतर्फे विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील लोककलांची व लोकसंस्कृतीची माहिती होण्याकरिता दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी शालेय विद्यार्थ्यांकरीता लोककला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन ओंकार संकुल, बजाज हॉस्पिटलच्या पाठीमागे, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर येथे आले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील लोककलेवर आधारित गायन, वादन, नृत्य व नाट्य या विषयी प्रशिक्षण देण्यात आले. प्रथमता कार्यक्रमाच्या प्रारंभी पारंपरिक सामुहिक गण सादर केले. युवा शाहीर शुभम केंद्रे यांनी महाराष्ट्रातील शाहिरी लोकपरंपरा, लोक वाद्य याची माहिती सांगून स्फूर्ती गीत, भारूड सादर केले,युवा शाहीर ऋत्विक चव्हाण यांनी पोवाडा, भारूड , गायत्री तुपे यांनी पारंपरिक लावणी संदर्भात सखोल माहिती देऊन सादरीकरण केले व साथसंगत केली, युवा शाहीर प्रथमेश शेवतेकर यांनी पारंपरिक तुंबडी कलाप्रकार सादर करून साथसंगत केलीबाल शाहीर अनुज हरणे यांने तुनंतूने झिलकरी म्हणून साथसंगत केली ढोलकीवादक अभिजित जाधव ढोलकीच साथ दिली तर हार्मोनियम वादक उमेश कापसे याने कार्यक्रमास हार्मोनियमची साथ दिली. दुपारच्या सत्रात नृत्य दिग्दर्शक उमेश चाबुस्कर यांनी कोळी नृत्य चे प्रत्यक्ष मार्गदर्शन केले व विद्यार्थी कोळी नृत्य करून घेतले. प्रा. रमेश धोंडगे यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील लोकगीते चे प्रकार व लोकगीतेचे सादरीकरण करत विद्यार्थ्याकडून गायन करून घेतले यावेळी प्राध्यापक मुरलीधर भुताळे यांनी ढोलकीची साथ दिली. डॉ. प्रा. राजू सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना लोककलेचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळा समारोप पूर्वी विद्यार्थ्यांची २५ गुणाची लेखी परीक्षा घेण्यात आली. कार्यशाळेतील सर्वोत्कृष्ट गुण प्राप्त कार्यशाळेत केंद्र निहाय ५ विद्यार्थ्यांचा बालरंगभूमी परिषदेतर्फे होणाऱ्या लोककला महोत्सव प्रसंगी यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष आसेफ शेख अन्सारी, उपाध्यक्ष (उपक्रम) वाल्मीक जाधव, प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड, कोषाध्यक्ष विनोद आघाव, सहकार्य अर्चना देवधर, कार्यकारणी सदस्य रमेश साळुंके, युवा प्रतिनिधी अभिजीत भातलौंढे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारणी सदस्य लक्ष्मण अहिरे, श्रीपाद पदे यांनी परिश्रम घेतले. सदरील कार्यशाळेसाठी ओंकार संकुल चे सहकार्य मिळाले.

# वनस्पतीशास्त्रात अजय झिंजाडे यांना पीएच. डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** अजय शिवाजी झिंजाडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएच. डी. पदवी प्रदान केली. त्यांनी “स्टडीज ऑन जेनेटिक डायवर्सिटी ऑफ फ्युसेरियम कॉज़िंग विल्ट अँड इट्स मॅनेजमेंट फॉर सस्टेनेबल अँग्रीकल्चर" या विषयांवर संशोधन केले असून त्यांना वरीष्ठ प्राध्यापक व माजी विभागप्रमुख डॉ. अशोक चव्हाण यांनी मार्गदर्शन केले आहे. श्री. अजय झिंजाडे हे सध्या छत्रपती शाहू आर्टस्, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अजय झिंजाडे यांना सारथी मार्फत शिष्यवृत्ती प्राप्त होऊन आर्थिक साहाय्य मिळाले होते. त्यांनी आज पर्यंत एकूण 20 संशोधन पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरती प्रसिद्ध केलेले असून त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चा सत्रात सहभाग नोंदविला आहे. त्यांना कोलंबो (श्रीलंका) येथील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात "तरुण वैज्ञानिक शास्त्रज्ञ" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते तसेच कडा (बीड) येथील राष्ट्रीय चर्चासत्रात प्रथम पारितोषिक देण्यात आले होते. त्यांनी "मेडिसिनल प्लांट आयडेंटिफीकेशन डीव्हाइस" या विषयावर पेटंट मिळविले आहे. अजय झिंजाडे यांच्या या संशोधनामुळे वनस्पतीरोगशास्त्र आणि कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात उपयुक्त माहिती उपलब्ध झाली असून, शेतकऱ्यांना विल्ट रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी शाश्वत व पर्यावरणपूरक उपाययोजना विकसित करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अजय झिंजाडे यांच्या शैक्षणिक प्रवासातील हे यश त्यांचे वडील शिवाजी झिंजाडे व आई उषाताई झिंजाडे तसेच संपूर्ण झिंजाडे परिवारासाठी अभिमानाची बाब ठरले आहे. ग्रामीण व कृषी पार्श्वभूमीतून पुढे येत वनस्पतीशास्त्रासारख्या महत्त्वपूर्ण विषयात उच्च शिक्षण घेत संशोधनाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रासाठी योगदान देण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, प्राचार्य बी. टी. पवार, विभाग प्रमुख डॉ. अरविंद धाबे, प्रा. डी. एस. मुकादम, डॉ. श्रीकांत माने यांच्या समवेत संशोधक सहाय्यक डॉ. एस. एम. पवार, डॉ. अनिल कुलकर्णी, डॉ. के. व्ही. बदर, डॉ. शशिकांत बंडेवार, डॉ. पद्माकर मुरूमकर, डॉ. प्रशांत पांगरीकर, डॉ. राजेंद्र काकडे, डॉ. राजेश गायकवाड, सौ. कुसुम चव्हाण, सौ. वर्षा माने, डॉ. शिल्पा चव्हाण, डॉ. पूजा सावंत, डॉ. सृष्टी काळे, डॉ. प्रतीक्षा शेकडे, डॉ. रोहिणी पुंडगे, डॉ. सुमेध चव्हाण, डॉ. सुनील गवळी तसेच पल्लवी गवई, विशाल हिवाळे,अभिषेक राऊत आणि शेख उजेर यांनी त्यांचे अभिनंदन केले.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ ऑगस्ट २०२६


# भटक्या - विमुक्तांच्या मुक्तीपासून सन्मानाच्या वाटचालीपर्यंत

३१ ऑगस्ट हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि भावनिक दिवस आहे. हा केवळ एखादा स्मृतिदिन नाही, तर अन्याय, कलंक, उपेक्षा आणि सामाजिक बहिष्काराच्या दीर्घ इतिहासातून स्वाभिमान, समानता आणि मानवी प्रतिष्ठेकडे वाटचाल करण्याचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास २०२५ मध्ये अधिकृत मान्यता दिली. त्यामुळे हा दिवस साजरा करताना केवळ औपचारिक कार्यक्रम न करता भटके-विमुक्त समाजाच्या ऐतिहासिक वेदना, वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यातील संधी यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.भारतीय समाजरचनेत भटक्या आणि विमुक्त जमातींचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. उपजीविकेच्या पारंपरिक साधनांनुसार, जीवनपद्धतीनुसार आणि भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक समूहांनी भटकंतीचे जीवन स्वीकारले. काही समूह पारंपरिक कला, लोककला, पशुपालन, हस्तकला, मनोरंजनाचे विविध प्रकार, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लघु व्यापार, लोहारकाम, दगडकाम, बांधकामाशी संबंधित कौशल्ये किंवा इतर पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून होते. स्थिर गावव्यवस्थेच्या चौकटीबाहेर राहणाऱ्या या समूहांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या बळावर समाजजीवनात महत्त्वाचे योगदान दिले. मात्र स्थिर वस्ती, जमीन आणि पारंपरिक सामाजिक संस्थांच्या अभावामुळे त्यांना सामाजिक सुरक्षेपासून आणि संस्थात्मक संधींपासून मोठ्या प्रमाणावर वंचित राहावे लागले.भटके आणि विमुक्त या संज्ञांमध्ये सूक्ष्म फरक आहे. भटक्या जमातींच्या जीवनपद्धतीत स्थलांतर आणि भटकंतीला विशेष महत्त्व असते; तर 'विमुक्त' ही संज्ञा ब्रिटिश राजवटीत 'गुन्हेगार जमाती' म्हणून कलंकित करण्यात आलेल्या आणि नंतर त्या कायदेशीर कलंकातून मुक्त झालेल्या समुदायांसाठी वापरली जाते. महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त समाजात अनेक विविध जाती-जमातींचा समावेश होतो. या विविध समूहांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती एकसारखी नसली तरी ऐतिहासिक उपेक्षा आणि सामाजिक कलंकाचा अनुभव अनेक समूहांना समानपणे सहन करावा लागला आहे.या समाजाच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय म्हणजे ब्रिटिशांनी लागू केलेला 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट' होय. १८७१ मध्ये करण्यात आलेल्या या कायद्यामुळे काही संपूर्ण जाती-जमातींना त्यांच्या वैयक्तिक कृतीवर नव्हे, तर केवळ जातीय ओळखीच्या आधारे 'गुन्हेगार' म्हणून नोंदविण्याची अमानुष व्यवस्था निर्माण झाली. म्हणजेच एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला किंवा नाही, यापेक्षा ती व्यक्ती कोणत्या समुदायात जन्माला आली आहे, याला अधिक महत्त्व देण्यात आले. हा आधुनिक न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच छेद देणारा प्रकार होता. या कायद्यामुळे संपूर्ण समुदायांवर संशयाची छाया पडली. त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात आले, नोंदणी आणि देखरेखीच्या विविध यंत्रणा उभ्या करण्यात आल्या आणि अनेकांना तथाकथित 'सेटलमेंट'मध्ये ठेवण्यात आले. त्यांच्या स्वातंत्र्यावर आणि उपजीविकेच्या पारंपरिक मार्गांवर निर्बंध आले. परिणामी सामाजिक कलंक, आर्थिक दारिद्र्य आणि प्रशासकीय नियंत्रण यांचे दुष्टचक्र निर्माण झाले. सर्वात वेदनादायक बाब म्हणजे 'गुन्हेगार' हा शिक्का व्यक्तीच्या कृतीशी जोडलेला नसून जन्माशी जोडला गेला. अशा प्रकारची जन्मजात गुन्हेगारीची कल्पना मानवी प्रतिष्ठेला नाकारणारी होती.भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक इतिहासातही या समुदायांचे योगदान अनेकदा पुरेसे अधोरेखित झालेले दिसत नाही. ब्रिटिश सत्तेविरुद्ध विविध स्वरूपात प्रतिकार करणाऱ्या अनेक स्थानिक समुदायांवर ब्रिटिश प्रशासनाने कठोर नियंत्रण ठेवले. भटक्या-विमुक्त समाजातील विविध समूहांच्या इतिहासात स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अस्तित्वासाठी संघर्षाची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच या समाजाचा इतिहास केवळ दारिद्र्याचा किंवा मागासलेपणाचा इतिहास म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. तो प्रतिकाराचा, जिद्दीचा, सांस्कृतिक सातत्याचा आणि अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या संघर्षाचा इतिहास आहे.स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीसमोर या ऐतिहासिक अन्यायाचे निराकरण करण्याचे आव्हान होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट-१८७१' रद्द करण्यात आला आणि त्या कायद्याच्या कक्षेत असलेल्या समुदायांना 'विमुक्त' म्हणून ओळख मिळाली. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजाच्या दृष्टीने एका ऐतिहासिक बंधनातून मुक्ततेचे प्रतीक ठरला.मात्र कायदा रद्द झाला म्हणून सामाजिक कलंक तात्काळ संपला नाही. कायद्याच्या पुस्तकातील 'गुन्हेगार' हा शब्द काढून टाकणे सोपे होते; पण समाजाच्या मानसिकतेतील संशय आणि पूर्वग्रह दूर करणे अधिक कठीण होते. अनेक दशकांनंतरही भटक्या-विमुक्त समाजातील काही घटकांना पोलिसी संशय, सामाजिक अविश्वास आणि भेदभावाचा सामना करावा लागल्याचे सामाजिक अभ्यासांतून आणि विविध अनुभवांतून दिसून येते. एका अन्यायकारक कायद्याने निर्माण केलेली मानसिकता पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, याची ही जाणीव करून देणारी बाब आहे. भटक्या-विमुक्त समाजाच्या वर्तमान प्रश्नांकडे पाहिले तर शिक्षण हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थिर निवासाचा अभाव, वारंवार स्थलांतर, आर्थिक अस्थिरता, शाळेपासून भौगोलिक अंतर आणि कागदपत्रांची कमतरता यामुळे अनेक मुलांना सातत्याने शिक्षण घेणे कठीण जाते. एखादे मूल शाळेत दाखल झाले तरी कुटुंबाच्या स्थलांतरामुळे त्याचे शिक्षण खंडित होऊ शकते. त्यामुळे केवळ शाळेत प्रवेश देणे पुरेसे नाही; शिक्षणाची सातत्यपूर्णता, वसतिगृहांची उपलब्धता, शिष्यवृत्ती, शैक्षणिक मार्गदर्शन आणि कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याशी जोडलेली उपाययोजना आवश्यक आहे.शिक्षणाबरोबरच निवासाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. स्थिर घर हे केवळ निवाऱ्याचे साधन नसून शिक्षण, आरोग्य, मतदानाचा हक्क, सरकारी योजना, बँकिंग, रोजगार आणि सामाजिक सुरक्षितता यांच्याशी जोडलेले असते. ज्यांच्याकडे स्थिर पत्ता नाही, त्यांच्यासाठी अनेक शासकीय प्रक्रियाच कठीण होतात. जन्मनोंदणी, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, आधारसारखी ओळखपत्रे, शिधापत्रिका आणि इतर कागदपत्रे मिळविण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींमुळे योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे 'कागदपत्रे' हा केवळ प्रशासकीय विषय नसून सामाजिक समावेशनाचा मूलभूत प्रश्न आहे.रोजगाराच्या बाबतीतही भटक्या-विमुक्त समाजासमोर मोठी आव्हाने आहेत. पारंपरिक व्यवसायांमध्ये आधुनिक बाजारपेठेतील बदलांमुळे उत्पन्नाच्या संधी कमी झाल्या आहेत. अनेक पारंपरिक कला आणि कौशल्ये आधुनिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली नाहीत तर ती पुढील पिढ्यांपर्यंत टिकणे कठीण होईल. त्यामुळे पारंपरिक कौशल्यांचे जतन करताना त्यांचे आधुनिक कौशल्यविकास, बाजारपेठ, डिजिटल माध्यमे, सहकारी संस्था आणि उद्योजकतेशी नाते जोडणे आवश्यक आहे. समाजातील युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक व्यापक होऊ शकतो.महिलांच्या प्रश्नांकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्त समाजातील महिलांना गरिबी, अस्थिर उपजीविका, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक अडचणी आणि सामाजिक असुरक्षितता अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागू शकते. महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य, स्वयं-सहायता गटांची निर्मिती, कौशल्यविकास, आर्थिक साक्षरता, सुरक्षित निवास आणि आरोग्यसेवा यांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाचा खरा विकास मोजायचा असेल तर त्या समाजातील महिलांची स्थिती आणि मुलींच्या शिक्षणाच्या संधी यांचा विचार करणे अपरिहार्य आहे.भटके-विमुक्त समाजाच्या सांस्कृतिक संपदेचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे. लोककला, लोकपरंपरा, मौखिक इतिहास, लोकसंगीत, कथाकथन, हस्तकला, पारंपरिक ज्ञान आणि जीवनपद्धती ही भारतीय सांस्कृतिक विविधतेची महत्त्वपूर्ण अंग आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहात या परंपरा नष्ट होऊ नयेत, यासाठी त्यांचे दस्तऐवजीकरण आणि संवर्धन आवश्यक आहे. मात्र संस्कृतीचे संवर्धन करताना त्या समाजाला केवळ 'लोककलेचे प्रदर्शन' म्हणून पाहणे टाळले पाहिजे. त्यांच्या संस्कृतीचा आदर करण्याबरोबरच त्यांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवास आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांनाही समान महत्त्व दिले पाहिजे.आज संविधानिक मूल्ये भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी आपल्याला महत्त्वाची दिशा देतात. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. त्यामुळे जन्म, जात, जीवनपद्धती किंवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीकडे संशयाने पाहणे संविधानाच्या समतेच्या भावनेला विरोध करणारे आहे. भटके-विमुक्त समाजाचा प्रश्न हा केवळ एखाद्या विशिष्ट समाजघटकाचा प्रश्न नसून भारतीय लोकशाहीच्या समावेशकतेची कसोटी आहे.महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस अधिकृतपणे 'भटके विमुक्त दिवस' म्हणून मान्य केल्यामुळे या प्रश्नांना नव्याने सामाजिक आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु कोणताही स्मृतिदिन तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा त्या निमित्ताने वास्तवातील प्रश्नांवर ठोस कृती होते. कार्यक्रम, भाषणे आणि गौरव सोहळे आवश्यक असले तरी त्यापलीकडे जाऊन शिक्षण, निवास, रोजगार, आरोग्य, कागदपत्रे आणि सामाजिक सुरक्षा या प्रश्नांवर परिणामकारक उपाययोजना होणे अधिक महत्त्वाचे आहे.भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजातील संवेदनशील घटक यांनी परस्पर सहकार्याने काम करण्याची गरज आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी या समाजाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा, शिक्षणाचा, अर्थकारणाचा आणि सामाजिक बदलाचा शास्त्रीय अभ्यास वाढवला पाहिजे. त्यांच्या विषयी संशोधन करताना मात्र त्यांच्याकडे केवळ 'अभ्यासाचा विषय' म्हणून न पाहता त्यांच्या अनुभवांना आणि ज्ञानाला महत्त्व देणे आवश्यक आहे. विशेषतः नव्या पिढीच्या युवकांना या समाजाच्या प्रश्नांशी जोडणे महत्त्वाचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्यास भटक्या-विमुक्त समाजातील युवक केवळ रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनू शकतात. पारंपरिक कौशल्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सांस्कृतिक वारसा आणि आर्थिक विकास यांची सांगड घालता येऊ शकते.३१ ऑगस्टचा भटके-विमुक्त दिन आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो की कायदा बदलला, पण समाजाची मानसिकता कितपत बदलली? १९५२ मध्ये कायदेशीर मुक्ती मिळाली; परंतु खरी सामाजिक मुक्ती तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा कोणत्याही मुलाला त्याच्या जन्माच्या आधारावर कमी लेखले जाणार नाही, कोणत्याही कुटुंबाला केवळ त्याच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे संशयाच्या नजरेने पाहिले जाणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या पार्श्वभूमीचा पुरावा देत राहण्याची गरज भासणार नाही. कायद्याने दिलेली समानता समाजमानसात उतरली, तरच स्वातंत्र्याचा अर्थ खऱ्या अर्थाने व्यापक होईल.आज भटके-विमुक्त समाजाकडे दयेच्या नजरेने पाहण्याची नव्हे, तर समानतेच्या आणि सन्मानाच्या नजरेने पाहण्याची गरज आहे. त्यांच्या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी योजनांच्या चौकटीतून न पाहता सामाजिक न्यायाच्या व्यापक चौकटीतून पाहिले पाहिजे. 'त्यांच्यासाठी काय करता येईल?' या प्रश्नाबरोबरच 'त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी कसे करून घेता येईल?' हा प्रश्नही विचारला पाहिजे. त्यांच्या नेतृत्वाला, अनुभवांना आणि ज्ञानाला विकासाच्या प्रक्रियेत स्थान मिळाले पाहिजे.३१ ऑगस्ट हा दिवस म्हणून साजरा करताना १९५२ च्या मुक्तीची आठवण ठेवणे आवश्यक आहे; परंतु त्याचबरोबर आजच्या पिढीसमोर उभ्या असलेल्या अदृश्य बंधनांचीही जाणीव ठेवली पाहिजे. शिक्षणाचा अभाव, भूमिहीनता, अस्थिर निवास, बेरोजगारी, कागदपत्रांचा प्रश्न, आरोग्याच्या सुविधा, सामाजिक पूर्वग्रह आणि आर्थिक असुरक्षितता ही आजची आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संवेदनशील धोरणांची आवश्यकता आहे.खऱ्या अर्थाने भटके-विमुक्त दिन साजरा करायचा असेल तर त्या दिवशी केवळ इतिहासाचे स्मरण न करता भविष्याचा संकल्प करावा लागेल. प्रत्येक भटक्या-विमुक्त मुलाला दर्जेदार शिक्षण, प्रत्येक कुटुंबाला सन्मानजनक निवास, प्रत्येक युवकाला कौशल्य व रोजगाराची संधी, प्रत्येक महिलेला सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबन, प्रत्येक नागरिकाला आवश्यक कागदपत्रे आणि प्रत्येक व्यक्तीला संविधानाने दिलेली समान प्रतिष्ठा मिळवून देण्याचा संकल्प करावा लागेल. हीच त्या ऐतिहासिक मुक्तीची खरी फलश्रुती ठरेल.भटक्या-विमुक्त समाजाची कहाणी ही केवळ एका समाजाची कहाणी नाही; ती भारतीय लोकशाहीच्या सामाजिक न्यायाच्या प्रवासाची कहाणी आहे. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी एका अन्यायकारक कायद्याची समाप्ती झाली; आता ३१ ऑगस्ट हा दिवस सामाजिक पूर्वग्रह, भेदभाव आणि वंचिततेच्या अदृश्य भिंती मोडण्याच्या नव्या संकल्पाचा दिवस झाला पाहिजे. कायद्याने दिलेली मुक्ती सामाजिक सन्मानात आणि आर्थिक स्वावलंबनात रूपांतरित झाली, तरच 'विमुक्त' ही संज्ञा केवळ इतिहासाची आठवण न राहता वर्तमानाची जिवंत वास्तवता बनेल. म्हणूनच भटके-विमुक्त दिनाचा संदेश स्पष्ट आहे की मुक्ती केवळ बंधनांतून बाहेर पडण्यात नाही; तर समान संधी, सन्मान, स्वाभिमान आणि न्यायासह समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठेने उभे राहण्यात आहे.





**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ ऑगस्ट २०२६

# भारतीय समाजव्यवस्था आणि आंबेडकरी विचारमूल्यांचा शोध




भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करणाऱ्या प्रत्येक गंभीर अभ्यासकाला एक प्रश्न नेहमीच सतावत असतो: ज्या परंपरेने हजारो वर्षांपासून आपल्याच लाखो बांधवांना पद्धतशीरपणे अमानुष विटंबना आणि अपमान सोसण्यास भाग पाडले, अशा परंपरेत अंतर्गत सुधारणा करणे खरोखरच शक्य आहे का? की ती मुळापासूनच मोडून काढावी लागेल? एक निष्णात कायदेतज्ज्ञ, प्रकांड पंडित, भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार आणि भारतातील जातीव्यवस्थेचे सर्वात निर्भीड व अचूक निदान करणारे विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याचे अत्यंत स्पष्ट आणि तितकेच वेदनादायी उत्तर दिले आहे— ते म्हणजे, केवळ 'सुधारणा' पुरेशी नाही. आज गरज आहे ती आपल्या नैतिक जीवनाच्या संपूर्ण व्याकरणामध्येच एक मोठी क्रांती घडवून आणण्याची. बाबासाहेबांनी सामाजिक परस्पर संवादाचे नियम (Rules of social interaction) आणि नैतिक तत्त्वे (Moral principles) यांमधील मूलभूत फरक स्पष्ट केला आहे. सामाजिक नियम—जसे की विशिष्ट समुदायांना जोडलेली कर्तव्ये, खाण्यापिण्याविषयीचे नियम, लग्नकार्यांचे निर्बंध आणि धार्मिक विधी—यामध्ये कदाचित काही सामाजिक उपयुक्तता असू शकते किंवा ते केवळ व्यवस्था चालवणाऱ्या प्रबळ वर्गाच्या सोयीचे असू शकतात. याउलट, नैतिक तत्त्वे—जसे की समता, मानवी प्रतिष्ठा आणि बंधुभाव—ही वैश्विक असतात आणि त्यांना एक सखोल अर्थ असतो. ही तत्त्वे कोणत्याही विशिष्ट समुदायाच्या परंपरेनुसार बदलता येत नाहीत किंवा त्यांच्याशी तडजोड करता येत नाही. बाबासाहेबांच्या मते, सामाजिक नियमांनाच 'नैतिक तत्त्वे' समजण्याची गल्लत करणे, हा ब्राह्मणशाही हिंदू धर्माने भारतीय संस्कृतीवर केलेला सर्वात मोठा बौद्धिक अन्याय आहे. हाच विचार त्यांना त्यांच्या सर्वात तीक्ष्ण विश्लेषणात्मक दाव्याकडे घेऊन जातो. धर्मशास्त्राची परंपरा—ज्यामध्ये प्रामुख्याने मनुस्मृती आणि त्यासारख्या इतर ग्रंथांचा समावेश होतो—ती कोणत्याही अर्थाने 'तत्त्वांवर आधारित धर्म' (Religion of principles) नव्हती. तो मुळात केवळ 'नियमांचा धर्म' (Religion of rules) होता. हे नियम अत्यंत कडक, श्रेणीबद्ध आणि मानवी मूल्यांची अभिव्यक्ती करण्यासाठी नसून, समाजात केवळ अशा व्यवस्थेला टिकवून ठेवण्यासाठी तयार केले गेले होते ज्याच्या शिखरावर ब्राह्मण बसले होते आणि तळाशी असलेल्या बहुजन समाजाला केवळ हक्कांपासून वंचितच ठेवले गेले नव्हते, तर त्यांचे जगणे अत्यंत गुलामगिरीचे केले गेले होते. तथापि, ज्यांना 'कनिष्ठ जाती' म्हटले गेले त्यांच्या जीवनावर नियंत्रण ठेवणारे नियम—त्यांनी काय खावे, कोणाला स्पर्श करावा, कोणत्या सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करावा—या नियमांना धार्मिक मंजुरीचे (Religious Sanction) बळ दिले गेले होते. त्यामुळे या नियमांचे उल्लंघन करणे हा केवळ एक सामाजिक गुन्हा मानला जात नव्हता, तर तो एक 'धार्मिक अपराध' मानला जात असे. बाबासाहेबांच्या मते, हाच या व्यवस्थेचा मुख्य कणा होता. जेव्हा सामाजिक शोषणालाच 'पवित्र आणि धार्मिक' मानले जाते, तेव्हा त्या व्यवस्थेमध्ये अंतर्गत सुधारणा करणे अशक्य होऊन बसते; कारण शोषितांना असे सांगितले जाते की त्यांचा हा अपमान तात्कालिक नसून तो वैश्विक आहे आणि तोऐतिहासिक नसून सनातन (शाश्वत) आहे. अस्पृश्यतेचे वेगळे वास्तव अस्पृश्यतेच्या या अमानुष प्रथेचे विश्लेषण करण्यासाठी अधिक सखोल अभ्यासाची गरज होती. येथे बाबासाहेबांचे ऐतिहासिक आणि मानववंशशास्त्रीय संशोधन अत्यंत मूळ आणि क्रांतिकारी ठरते. अस्पृश्यता ही केवळ जातीच्या उतरंडीत सर्वात शेवटी असण्यामुळे निर्माण झालेली नाही, असा युक्तिवाद त्यांनी मांडला. तो एक स्वतंत्र इतिहास होता; ज्यामध्ये टोळ्यांमधून बहिष्कृत झालेल्या आणि बाबासाहेबांनी ज्यांना 'ब्रोकन मेन' म्हटले आहे, अशा समुदायांना धार्मिक विधींच्या शुद्धतेच्या नावाखाली कायमचा कलंक लावला गेला. या प्रक्रियेत 'गाईला' पवित्र मानण्याच्या प्रतीकात्मकतेचा मोठा वाटा होता. या उपेक्षित समुदायांमध्ये—काही वेळा आवडीमुळे नव्हे तर निव्वळ जगण्याच्या अपरिहार्यतेमुळे—होणारे गोमांस भक्षण (Beef-eating) हे ब्राह्मणशाही मानसिकतेत केवळ एक खाद्यसंस्कृतीचा फरक राहिला नाही, तर तो कायमच्या अपवित्रतेचा (Defilement) शिक्का बनला. या प्रक्रियेतून, केवळ तात्कालिक कारणांमुळे झालेले हे सामाजिक बहिष्कृतत्व पुढे वंशपरंपरेत बदलले. एका अशा 'अपवित्रतेच्या तत्त्वज्ञानाने' (Metaphysics of pollution) जन्म घेतला ज्याने विशिष्ट मानवी समूहाला नैतिक समाजाच्या कक्षेबाहेर फेकून दिले. बाबासाहेबांनी ठामपणे सांगितले की, केवळ वंश किंवा व्यवसाय या आधारे अस्पृश्यतेचे स्पष्टीकरण दिले जाऊ शकत नाही. ती मुळात एक सामाजिक-धार्मिक निर्मिती होती आणि हे समजून घेतल्याशिवाय ती नष्ट करता येणे शक्य नाही. लक्षण आणि मूळ कारण यांमधील गल्लत महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमधील तुलना या दोन्ही महान नेत्यांच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकते. गांधीजींनी अत्यंत प्रामाणिक नैतिक वनेने अस्पृश्यतेचा निषेध केला होता. त्यांनी अस्पृश्य समाजाला दिलेले 'हरिजन'—म्हणजेच देवाची माणसे—हे नाव वंचितांना त्यांची हिरावून घेतलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवून देण्याचा एक प्रयत्न होता. परंतु, गांधीजींचा हा दृष्टिकोन त्यांच्या लाडक्या हिंदू नैतिक चौकटीच्या आतच राहिला. त्यांचा असा विश्वास होता की, जातीच्या भिंती ओलांडणारी भक्ती परंपरा हिंदू धर्मात अंतर्गत सुधारणा करण्यासाठी पुरेशी आहे. यावर बाबासाहेबांचे उत्तर अत्यंत रोखठोक होते: ते म्हणाले की, ब्राह्मणशाही सत्तेच्या संरचनेला केवळ नैतिक आवाहन करून सुधारता येऊ शकत नाही. ज्या धर्मग्रंथांनी शतकानुशतके जातीच्या शोषणाला पवित्र मानले, ते हिंदू धर्माचे दुय्यम भाग नसून त्याचा मुख्य आधार राहिले आहेत. त्यामुळे मूळ ग्रंथीय आणि संस्थात्मक पायाला धक्का न लावता केवळ लोकांच्या मानसिकतेत बदल करण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे मूळ आजारावर उपचार न करता केवळ त्याच्या वरवरच्या लक्षणांवर फुंकर घालण्यासारखे आहे. बौद्ध धर्माचा पर्याय आणि 'नवयान' मग यावर बाबासाहेबांचा पर्यायी मार्ग कोणता होता? १९५६ मध्ये त्यांनी घेतलेली बौद्ध धर्माची दीक्षा हा केवळ वैतागून घेतलेला एखादा निर्णय नव्हता, तर तो त्यांच्या प्रदीर्घ आणि सखोल तत्त्वज्ञानाचा परिपाक होता. भगवान बुद्धांच्या शिकवणीने ते सर्व काही दिले जे हिंदू धर्मशास्त्राने नाकारले होते: म्हणजेच, ग्रंथप्रामाण्यापेक्षा 'विवेकवादाला' (Reason) दिलेले महत्त्व, करुणेची वैश्विक भावना आणि जन्मावर आधारित नसलेला एक समान नैतिक समाज. ऐतिहासिक बौद्ध धर्माच्या अपयशाबाबत बाबासाहेब अनभिज्ञ नव्हते; या भूमीवर बौद्ध धर्म जातीव्यवस्थेला संपूर्णपणे संपवू शकला नाही, हे त्यांना ठाऊक होते. परंतु, बौद्ध धर्माच्या वैचारिक रचनेत समाज उभारणीची मोठी संसाधने आहेत, हे त्यांनी ओळखले होते. प्रसिद्ध तत्त्वज्ञ जॉन ड्युई (John Dewey) यांच्या प्रॅगमॅटिझम (Pragmatism - व्यवहारवाद) या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांचा असा विश्वास होता की, भूतकाळ केवळ जसाच्या तसा स्वीकारण्यासाठी नसून, तो आजच्या न्याय्य आणि नैतिक गरजांनुसार पुन्हा नव्याने घडवण्यासाठी (Refashioned) असतो. त्यांचा 'नवयान' (Navayana) हा नेमका हाच विचार होता—न्यायाच्या निकषांवर घासून शुद्ध केलेला एक नवीन बौद्ध धर्म. धर्मनिरपेक्ष राज्याचे तत्त्वज्ञान या सर्व मंथनातून धर्मनिरपेक्ष राज्याचे एक वैशिष्ट्यपूर्ण तत्त्वज्ञान समोर येते, ज्याकडे भारतीय संविधानाच्या संदर्भात आज जितके लक्ष दिले पाहिजे तितके दिले गेलेले नाही. भारतातील धर्मनिरपेक्षता ही केवळ धर्माच्या विरोधात निर्माण झालेली नाही, तर ती धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या संस्थात्मक शोषणाच्या विरोधात उभी राहिलेली आहे. परंतु, अलीकडच्या काळात ही संकल्पना केवळ दोन वेगवेगळ्या धर्मांमधील संघर्ष आणि वाद मिटवण्यापुरतीच मर्यादित ठेवली गेली आहे. भारतातील धर्मनिरपेक्षतेच्या या चर्चेत बाबासाहेबांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी धार्मिक शोषणाच्या दुसऱ्या अत्यंत महत्त्वाच्या बाजूला ओळखले होते—ते म्हणजे धर्माच्या नावाखाली एकाच धर्मांतर्गत चालणारे शोषण, अस्पृश्यता, बहिष्कृतता आणि उच्च जातींनी कनिष्ठ जातींचा केलेला पद्धतशीर अपमान. भारताची ही सामाजिक परिस्थिती पाहता, हा गंभीर अन्याय मुळापासून उपटून टाकण्यासाठी राज्यसंस्थेने सक्रिय हस्तक्षेप करणे अनिवार्य होते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव—या मूल्यांना बाबासाहेब केवळ शब्द म्हणून नव्हे तर मूलभूत तत्त्वज्ञान म्हणून पवित्र मानत असत. त्यामुळे या मूल्यांशी कटिबद्ध असणाऱ्या कोणत्याही लोकशाही राज्याने अस्पृश्यतेसारख्या एकाच धर्मांतर्गत चालणाऱ्या शोषणाला कडाडून विरोध केलाच पाहिजे. जातीचे हे शोषण म्हणजे केवळ वैयक्तिक श्रद्धेचा भाग नव्हता की ज्याला 'धार्मिक स्वातंत्र्या'च्या नावाखाली जपावे; तर ती सत्तेची एक अशी जुलमी रचना होती जी धार्मिक नियमांच्या आधारे सामान्य माणसावर लादली गेली होती. म्हणूनच, आपल्या लोकशाही राज्याला या जातीव्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचा पूर्ण अधिकार असून ती नष्ट करणे हे त्याचे आद्य कर्तव्य आहे. निष्कर्ष थोडक्यात सांगायचे तर, बाबासाहेबांच्या कार्यातून निर्माण झालेली ही नैतिक दूरदृष्टी भारतीय प्रजासत्ताकाने आपल्या संविधानाच्या पुस्तकात जितकी जपली आहे, तितकी ती आजही आपल्या दैनंदिन वास्तवात उतरलेली नाही. त्यांना हे चांगले ठाऊक होते की, मानवी प्रतिष्ठा (Human Dignity) ही केवळ एक भावना नसून ते एक राजकीय आणि सामाजिक यश आहे—जे अत्यंत नाजूक आहे आणि त्याला टिकवून ठेवण्यासाठी भक्कम संस्थात्मक रचना व सतत जागृत राहण्याची (Perpetual Vigilance) गरज आहे.आज बाबासाहेबांच्या विचारांशी संवाद साधणे म्हणजे केवळ एका ऐतिहासिक नेत्याचे स्मरण करणे नव्हे, तर आपल्यासमोर असलेल्या एका अत्यंत ज्वलंत आणि तातडीच्या मागणीला सामोरे जाणे आहे: ती मागणी म्हणजे—आपल्याला लाभलेल्या वारशाचे मूल्यमापन तो किती 'जुना' आहे यावरून न करता, तो किती 'न्याय्य' आहे यावरून झाले पाहिजे; आणि जो वारसा न्यायाच्या कसोटीवर उतरत नाही, मग तो कितीही पवित्र का असेना, तो झटकून टाकण्याचे धैर्य आपण दाखवले पाहिजे.

**लेखक: राजीव भार्गव हे प्रख्यात राजकीय विश्लेषक व विचारवंत**

**भाषांतर : प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**समाजशास्त्र विभाग,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना**
**साभार: फ्रंटलाईन**